“चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे कंत्राटी मनुष्यबळ (कक्ष सेवक) सेवेस मुदत वाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.१०४/आरोग्य ३
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ३० मार्च, २०१९.

वाचा :

१) **सह संचालक, आरोग्य सेवा रुग्णालय (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांक-ससंआसे/राज्यस्तर/कक्ष-३/टे-९/अवैकंत्राटी/देयके/मंजुरी/ सारुचंद्रपूर/३६८६-८७/१९ दि.०१.०३.२०१९**

प्रस्तावना :

जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर अंतर्गत ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथील कंत्राटी मनुष्यबळ (कक्ष सेवक) सेवा ऑक्टोंबर, २०१६ पासून निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून सुरु करण्यात आली असून त्यास उपसंचालक स्तरावर मे,२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर सेवेस जून २०१८ पासून मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता या संदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे

शासन निर्णय :

२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालये, चंद्रपूर अंतर्गत ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालये येथे मे. आधार स्वच्छता सेवा सहकारी संस्था, चंद्रपूर (ग्रा.रु.भद्रावती, नागभिड, गोंडपिंपरी, शिंदेवाही, ब्रम्हपूरी) व साई बहुउद्देशीय विकास संस्था जि. चंद्रपूर (ग्रा.रु. ब्रम्हपूरी, सावली, बल्लारपूर, राजूरा, गडचांदुर, कोरपना व उप.जि. रु. मुल) मार्फत कंत्राटी मनुष्यबळ (कक्ष सेवक - वर्ग ४) सेवा पुरविण्यात आली होती. सदर सेवेस जुन, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत खालील प्रमाणे मुदत वाढ देण्यात येत आहे:-

अ.क्र.	रुग्णालयाचे नाव	दर प्रति मनुष्यबळ प्रती महा	मनुष्यबळ
१	२	३	४
१	ग्रा.रु. सावली	रु.१११६६/-	२
२	ग्रा.रु. बल्लारपूर	रु.१११६६/-	२
३	ग्रा.रु. भद्रावती	रु.१००८३/-	१
४	ग्रा.रु.राजूरा	रु.१११६६/-	१
५	ग्रा.रु.शिंदेवाही	रु. १००८३/-	१

अ.क्र.	रुग्णालयाचे नाव	दर प्रति मनुष्यबळ प्रती महा	मनुष्यबळ
१	२	३	४
१	ग्रा.रु. सावली	रु.१११६६/-	२
६	ग्रा.रु.गडचांदूर	रु.१११६६/-	२
७	ग्रा.रु.ब्रम्हपूरी	रु. १००८३/-	३
८	ग्रा.रु.कोरपना	रु.१११६६/-	२
९	उप जि.मूल	रु.१११६६/-	४
१०	ग्रा.रु.नागभिड	रु. १००८३/-	२
११	ग्रा.रु.गोंडपिंपरी	रु.१११६६/-	३

३. ई-निविदे द्वारे अंतिम झालेल्या पुरवठादारास दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून पुढील कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

४. सदर प्रस्तावारवरील खर्च जिल्हा नियोजन विकास मंडळ चंद्रपूर यांच्याकडील उपलब्ध निधीतून करण्यात यावा.

५. यापूढे कंत्राटी स्वरुपाच्या नेमणूका मंजुर कंत्राटी पदावरच करण्यात याव्यात.

६. यापूर्वी देण्यात आलेल्या कार्यरंभ आदेशातील व करारातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदार संबंधित अधिकाऱ्याची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१५४१५८८३१७ असा आहे. आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.03.30 23:11:09 +05'30'

(रो.दि. कदम पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

२. आयुक्त आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुगणालय राज्यस्तर), मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, नागपूर.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, जि. चंद्रपूर.
८. निवडनस्ती (आरोग्य-३).